दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ११७ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# नाशिकचा कुंभमेळा होणार हाय-फाय! डिजिटल तंत्रज्ञान 'एआय' चा वापर होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या सूचना

### रस्ते मार्गांचे बळकीटकरण करावे

सिंहस्थसाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजी नगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गाने भाविक येण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने त्या मार्गातील रस्त्यांचे बळकटीकरण करावे. त्या रस्त्यांवर वाहनतळांची सुविधा निर्माण करावी. कुंभ काळात नाशिक शहरात वाहने सोडण्यात येऊ नये. भाविकांसाठी वाहनतळ ते शहरात प्रवासासाठी ई बसचा पर्याय उपलब्ध करून द्यावा. तसेच या ई बस प्रत्येक तीन मिनिटांना सुटतील असे नियोजन करावे. तसेच शिर्डी, छत्रपती संभाजी नगर, ओझर या विमानतळावरही प्रवाशांचे नियोजन करावे. शिर्डी विमानतळावर विमाने थांबविण्यासाठी जागा वाढविण्यात यावी. तसेच ओझर विमानतळावरही अधिक विमानांचे लँडिंगसाठी सोय उपलब्ध करून द्यावी. नाशिक शहरात हेलिपॅड उभारता येतील का याचा विचार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी दिले.रेल्वे प्रशासनासाठी समन्वय साधून रेल्वेने येणाऱ्या भाविकांसाठी नाशिक रोड, इगतपुरी, कसारा आदी स्थानकांमध्ये सोयी सुविधा निर्माण कराव्यात, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

### धार्मिक कॉरिडॉर निर्माण करावे

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आलेला भाविक हा जवळच्या त्र्यंबकेश्वर, शिर्डी, वणी, शनिशिंगणापूर, मांगीतुंगी अशा धार्मिक स्थळांनाही भेट देतो. त्या अनुषंगाने या धार्मिक स्थळांचे कॉरिडॉर तयार करावे. नाशिकमधील राम काल पथाचे काम पुढील वर्षीपर्यंत पूर्ण करावे. तसेच त्र्यंबकेश्वर मंदिराच्या संवर्धनाचे काम हाती घ्यावे. त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्तासह इतर कुंडांच्या सौंदर्यीकरण केल्यास भाविकांना तेथे जाता येईल. त्याशिवाय नाशिक व त्र्यंबकेश्वर मंदिरांच्या शेजारील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



**मुंबई (वृत्तसंस्था)**–त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यांसाठी वेगळे कुंभमेळा प्राधिकरण निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आढावा बैठकीत दिल्या. तसेच हा सिंहस्थ कुंभ 'डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ' म्हणून ओळखला जावा, यासाठीचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.सन २०२७ मध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसंदर्भात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागाचे सचिव उपस्थित होते.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सादरीकरण केले. मागील बैठकीत मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार नाशिकमधील एक पथक प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्याच्या तयारीची माहिती घेण्यास पाठविण्यात आली होती. या पथकाने नोंदविलेल्या सूचना व त्याअनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळ्यात करावयाच्या सोयी सुविधांचा यावेळी आढावा घेण्यात आला. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन सुव्यवस्थित व्हावे, सर्व यंत्रणांचा समन्वय व्हावा, कुंभ मेळ्याची कामे गतीने व्हावीत, यासाठी कुंभमेळा प्राधिकरण तयार करावे. यासाठी कुंभमेळा प्राधिकरण कायदा तयार करावा. कुंभमेळ्यासाठी लागणारे मनुष्यबळ कुंभमेळा प्राधिकरणाच्या अखत्यारित घ्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या बैठकीत दिल्या.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी यापूर्वीच प्राथमिक आराखडा तयार केला होता. मात्र, प्रयागराजमधील महाकुंभसाठी झालेली गर्दीची परिस्थिती पाहता नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आणखी चार ते पाच पट गर्दीच्या अनुषंगाने जास्तीचे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. गर्दीचे व्यवस्थापन, घाटांची संख्या, रस्ते, रेल्वे व हवाई वाहतुकीचे नियोजनही या आराखड्यात असावे. नाशिक त्र्यंबक रस्ता २४ मीटर वाढविण्यात यावा. तसेच या रस्त्यांच्या कडेला टेंट सिटी उभारण्यासंदर्भातही विचार करावा. नाशिक शहरातील रस्त्यांची कामे पूर्ण करावीत. गोदावरी नदीच्या काठावर किनारी रस्ता तयार करता येईल का याचा ड्रोन सर्व्हे करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

### डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ व्हावा

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा. गर्दीचे नियोजन, वाहतूक नियोजन तसेच सर्व्हेलन्ससाठी जास्तीत जास्त 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करावा. ज्या भागातून जास्त गर्दी होते त्या रस्त्यांवर गर्दीच्या नियोजनासाठी व भाविकांना वेळ घालविता यावा, यासाठी त्या ठिकाणी डिजिटल कुंभसंदर्भातील प्रदर्शन तयार करावे. सिंहस्थ कुंभ मेळ्याच्या लोगो निर्माण करण्यासाठी स्पर्धा घ्यावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.सन २०१५ मध्ये झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या माहितीचे विश्लेषण करून पुढील कुंभमेळ्यासाठी कसे नियोजन करता येईल, याचा अभ्यास करावा. सिंहस्थ दरम्यान गोदावरी नदीचे पाणी वाहते राहिले पाहिजे, जेणेकरून भाविकांना स्वच्छ पाण्यात स्नान करता येईल, यासाठी नियोजन करावे. तसेच साधुग्रामसाठी भूसंपादन, साधुग्राम व इतर महत्त्वाच्या ठिकाणी आरोग्य केंद्रे, अग्निशमन सुविधा आदीसंदर्भातही सुयोग्य नियोजन करून आराखडा तयार करावे. तसेच कुंभ कालावधीत नागरिकांपर्यंत माहिती जलदगतीने मिळण्यासाठी संपर्क यंत्रणा (पब्लिक ॲड्रेस सिस्टीम) निर्माण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी दिल्या.कुंभमेळा कालावधीत गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. तसेच कुंभ कालावधीत काम करणाऱ्या मनुष्यबळास प्रशिक्षण देण्यात यावे. कुंभमेळ्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असून त्यासाठीचे नियोजन करावे करण्याची सूचना जलसंपदा मंत्री श्री. महाजन यांनी यावेळी केली.

# रांजणगाव गणपतीच्या विकासासाठी ६९ कोटींचा निधी मंजूर

**शिरूर । प्रतिनिधी**

राज्य सरकारने रांजणगाव गणपती आणि परिसराच्या पायाभूत सुविधांसाठी मोठा आर्थिक हातभार लावत पाणीपुरवठा योजनेसाठी ६३ कोटी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी ६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा निधी उपलब्ध झाला आहे.

रांजणगाव गणपती हे तीर्थक्षेत्र आणि औद्योगिक हब असल्याने येथे वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. तसेच, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती आणि स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.या निधीच्या मंजुरीसाठी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, तसेच विविध वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि उद्योजक उपस्थित होते.बैठकीत रांजणगाव, कारेगाव आणि ढोकसावंगी ग्रामपंचायतींसाठी चखऊ मार्फत विकासकामे हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, उद्योजकांकडून सामाजिक दायित्व निधी (उडठ) उभारण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.या निधीमुळे रांजणगाव व परिसरातील नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा अनुभवता येणार आहे. औद्योगिक वाढ आणि तीर्थक्षेत्र म्हणून रांजणगाव गणपतीच्या महत्त्वाचा विचार करता हा निधी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.



# जयंत पाटलांचे प्रश्न मार्गी लावणार-चंद्रशेखर बावनकुळे

## मी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत बोलण्याइतका मोठा नाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यानंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले. पण जयंत पाटील यांचा राजकीय भविष्याबाबत बोलण्याइतका मोठा माणूस नाही, पण त्यांचे प्रश्न मार्गी लावणार असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, जयंत पाटील हे माझी वेळ घेऊन भेटायला आले होते. तिथे ४०० ते ५०० लोकं उपस्थित होती. आमच्यात कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही. केवळ विकास कामांसंदर्भात चर्चा झाली.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, जयंत पाटील यांनी त्यांच्या सांगली जिल्ह्यातील विकासकामांबाबत चर्चा केली. मी त्यांना आश्वासन दिले आहे की, येणाऱ्या अधिवेशनात त्यांच्या समस्यांच्या संदर्भात एक बैठक माझ्या दालनात लावणार आहे. जयंत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ते त्यांच्या मतदारसंघाचे प्रश्न घेऊन भेटायला आले होते. यावेळी विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली. जयंत पाटील यांनी सर्व विषय माझ्यासमोर मांडले. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे त्यावेळी माझ्यासोबत होते.जयंत पाटील म्हणाले की, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत माझी २५ मिनिटे चर्चा झाली, पण भेटीत राजकीय हेतू नव्हता असे स्पष्टीकरण राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नांदेड येथे सांगितले. मी सांगली येथील महसूलच्याप्रश्नाबाबत भेट घेतली. या वेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे देखील होते. पण, ही भेट राजकीय नव्हती. विधानसभा सदस्य म्हणून एखाद्या मंत्र्याला त्यांच्या विभागाच्या कामासंदर्भात भेटणे हे काही गैर नाही. तरीही प्रसारमाध्यमे अशा प्रकारच्या बातम्या बनवितात हे खेदजनक आहेत, असे जयंत पाटील यांनी म्हटले होते.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी अनेकदा दिल्लीतील मंत्र्यांना भेटत असते त्यांचे फोटो सोशल मिडीयावर पोस्ट करत असते. यात काही गैर नाही. विकास कामासंदर्भात मंत्र्यांच्या भेटी घ्याव्याच लागतात.



# नीलम गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले:त्या काहीही खोटे बोलल्या नाहीत, एकनाथ शिंदेंकडून पाठराखण

**मुंबई (वृत्तसंस्था)**–दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या एका चर्चा सत्रात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे गटावर तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळते, असे विधान त्यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर ठाकरे गटातील नेत्यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर टीकेची झोड उठवली. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांची पाठराखण केली आहे.

अंधेरी येथील जाहीर सभेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, नीलम गोऱ्हे हे दिल्लीच्या व्यासपीठांवरुन एक वाक्य बोलल्या आता ते व्यासपीठ बरोबर होते की चुकीचे होते हा भाग वेगळा. परंतु ते काही जणांना एवढे झोंबले की मिरच्या लागल्या. हा एकनाथ शिंदे त्यांना पुरुन उरला होता. गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले, त्यामुळे त्यांना मिरची लागली. नीलम गोऱ्हेंच्या आधीही अनेक लोक हे बोलले आहेत.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ना खोके नाही कंटेनर लागतात, असे राज ठाकरे बोलले होते. नारायण राणे, रामदास कदम, नितेश राणे असे अनेकजण बोललेत. हे काही नवीन नाही. पण नीलम ताई बोलल्यानंतर त्यांच्या मागे इतके लागले, त्यांना इतक्या मिरच्या लागल्या, पण नीलम ताईंवर इतक्या खालच्या दर्जावर जाऊन बोलणे, आरोप करणे त्यांना शोभत नाही. त्या खरे बोलल्या. काहीही खोटे बोलल्या नाहीत. आम्ही देना बँक आहोत आणि समोर लेना बँक आहेत, म्हणून ते जे बोलल्या ते कटू सत्य आहे.नीलम गोऱ्हे या महिलांवर अत्याचार झाला किंवा इतर काहीही झाले तर त्या पहिल्या धावून जायच्या, तेव्हा नीलम ताई चांगल्या होत्या. आताही शक्ती विधेयकात त्यांचे मोठे योगदान आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्या काम करतात. हीच पोट दु:खी आहे. ती पोट:दुखी थांबत नाही, कारण ते डॉक्टरकडून औषध घेत नाहीत, कंपांऊडरकडून औषध घेतात, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे.



# पुण्यात शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार

## वर्दळीच्या स्वारगेट बसस्टँडवर पहाटे घडली संतापजनक घटना

**पुणे (वृत्तसंस्था)**–पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. ती आज दुपारी समोर आली. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजली आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, पीडित तरुणी पुण्याहून फलटणला जात होती. ती मंगळवारी पहाटे स्वारगेट बसस्थानकावर थांबली होती. तेव्हा एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबल्याचे सांगितले. पण तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यावर तरुणीने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिला विश्वासात घेतले. त्यानंतर तो तिला जवळच उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये नेले. तिथे त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तेथून पळ काढला.

या घटनेमुळे हादरलेल्या तरुणीने आपल्या मित्राला फोनवरून ही घटना सांगितली. त्यानंतर मित्राने तिला तत्काळ पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. तद्नुसार तरुणीने स्वारगेट पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करत घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. या घटनेची वाच्यता होताच पुण्यात एकच खळबळ माजली.

# मातोश्री आशाताई कुणावार महिला विद्यालयात मरणोत्तर नेत्रदान संकल्प कार्यक्रमाचे आयोजन





**हिंगणघाट । प्रतिनिधी**

जिते जी रक्तदान, जाते जाते नेत्रदान
मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे एनएसएस विभागांतर्गत स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने 'मरणोत्तर नेत्रदान संकल्प' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्या विकास संस्थेचे अध्यक्ष तथा मातोश्री महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर तसेच मार्गदर्शक व प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. स्नेहल चौधरी , मातोश्री महिला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. सपना जयस्वाल, एन एस एस सहकार्यक्रम अधिकारी प्रा. भाग्यश्री साबळे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. वैशाली तडस, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. शितल कारमोरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वातंत्र्यवीर वि. दा.सावरकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली, मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयांच्या वतीने करण्यात आले. प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा प्रा. भाग्यश्री साबळे यांनी मांडली, तर मार्गदर्शक नेत्रतज्ज्ञ डॉ. स्नेहल चौधरी यांनी नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या दृष्टीने दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश देण्याचं अमूल्य कार्य आपण करू शकतो तसेच मोबाईलचा वापर हा कमीत कमी करावा याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर यांनी 'जिते जी रक्तदान, जाते जाते नेत्रदान' असे आवाहन करीत सुरुवात केली, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सुंदर गीताचे गायन करून त्यांच्या साहित्याची आठवण विद्यार्थ्यांना करून दिली, 'ने मजसी ने मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' त्यांचे विचार व तत्व विद्यार्थ्यांनी अंगीकारून परिवर्तन घडवावे व राष्ट्रहिताचा विचार करावा असे मत यानिमित्ताने त्यांनी व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. सपना जयस्वाल यांनी मरणोत्तर नेत्रदान व जनजागृती याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हर्षदा राऊत तर आभार प्रा. समीक्षा पवार यांनी मानले, कार्यक्रमाच्या आयोजनासाठी एन एस एस सी आर प्रिया उडकुडकर, खुशी कचवे, हर्षदा मोरे, खेमिका पारखी, प्राची उघडे, नीलिमा माथनकर व संपूर्ण प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीत पुढाकार घ्यावा–आ.राजेश बकाने

## पी.एम.किसान सन्मान निधी वितरण समारंभ संपन्न




**वर्धा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवावे आणि शेतीपूरक उद्योगांकडे वळावे, असे आवाहन आमदार राजेश बकाने यांनी केले. पी.एम. किसान सन्मान निधीच्या १९व्या हप्त्याच्या वितरण समारंभात ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते किसान सन्मान निधीचा हप्ता वितरित करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठीही वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.आधुनिक शेतीसोबतच बचत गटांनी उत्पादने तयार करून बाजारपेठेचा लाभ घ्यावा, असे मत आमदार राजेश बकाने यांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या उत्पादक वस्तूंसाठी देवळी येथे विशेष विक्री भवन उभारले जाईल, असेही त्यांनी जाहीर केले.शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांच्या सहकार्याने बीबीएफ तंत्रज्ञान, ड्रोन फवारणी, बिजोत्पादन आणि दुग्ध व्यवसायावर लक्ष केंद्रित करावे, असेही बकाने यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार अमर काळे होते. वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जीवन कतोरे, डॉ. रुपेश झाडोदे, डॉ. निलेश वझिरे, डॉ. सचिन मुळे, डॉ. सविता पवार, मंडळ कृषी अधिकारी सुभाष मुडे, तालुका कृषी अधिकारी निलेश उगवेकर, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक जांगळेकर, बायफचे संजय बाभूळकर आदी मान्यवर उपस्थित होते.राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत २६ दिवसीय मशरूम उत्पादन प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विस्तार शिक्षण विषयतज्ज्ञ डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी केले. तसेच डॉ. प्रेरणा धुमाळ, गजानन म्हसाळ, वैशाली सावके, आणि संपूर्ण कृषी विज्ञान केंद्र चमूने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात योगदान दिले.या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

# लिटील फ्लावर्स नर्सरी स्कूलमध्ये स्नेहसंमेलनाचा रंगतदार जल्लोष




**पाटस। प्रतिनिधी**

पाटस : लिटील फ्लावर्स नर्सरी स्कूल, पाटस येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाला पुणे येथील अतिस्व समुपदेशन केंद्राच्या संचालक व मानसतज्ज्ञ अर्चना शिवरकर राठोड आणि पाटस मेडिकल असोसिएशनच्या व्हाईस चेअरमन डॉ. निर्मला चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली, ज्यात संपूर्ण शिक्षकवर्ग सहभागी झाला. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ. बीना तुषार जाधव यांनी स्वागतपर भाषण करत उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत केले. सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलनानंतर विद्यार्थ्यांनी 'शुभम करोति' सादर करत वातावरण मंगलमय केले. प्रमुख पाहुणे अर्चना शिवरकर यांनी 'मुलांचे मोबाईलचे व्यसन थांबवण्यासाठी पालकांनी करावयाचे उपाय' या विषयावर मार्गदर्शन केले.या पुढील काळात त्यांचे या संदर्भातील विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारप्रवर्तक मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस नृत्याविष्कार सादर केले. विशेषतः 'छम छम छम', 'डिस्को दिवाने' आणि 'बाकी सब फर्स्ट क्लास है' या गाण्यांवरील त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

देशभक्तीपर गीतांवर सादर केलेल्या नृत्यांनी वातावरणात देशप्रेमाची भावना जागवली. 'भारत प्यारा देश हमारा' आणि 'जहां पांव में पायल हाथों में कंगन' या गाण्यांवर विद्यार्थ्यांनी उडवलेली रंगतदार उधळण उपस्थितांच्या स्मरणात राहील अशीच होती. कार्यक्रमाच्या शेवटी 'माऊली माऊली – पंढरीची वारी' या गाण्यावर सादर केलेल्या भावपूर्ण नृत्याने समारोपाची सांगता झाली. यावेळी वर्षभर विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच शिक्षकांच्या मेहनतीचीही दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. स्कूलचे संचालक डॉ. तुषार जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्रा. महेंद्र माने यांनी केले. लिटील फ्लावर्स नर्सरी स्कूलच्या या स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच पालक व शिक्षकांना आनंदाची अनुभूती दिली.

# माजी विद्यार्थिनी पूजा धोपटेचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगात यशस्वी निवडीनंतर गौरव सत्कार



**वर्धा (प्रतिनिधी)**

हिंगणघाट येथील भारत विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी पूजा प्रकाश धोपटे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत महसूल सहाय्यक अधिकारी पदासाठी निवड निश्चित केली आहे. तिच्या या उज्वल यशाबद्दल शाळेच्या वतीने विशेष गुणगौरव व सन्मान सत्कार आयोजित करण्यात आला. शालेय शिक्षण व प्रवास पूजाचे प्राथमिक शिक्षण चुन्नीलाल प्राथमिक विद्यालय, हिंगणघाट येथे झाले, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण भारत विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान विभागातून पूर्ण केले. मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर तिने हे यश संपादन केले.

विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी सत्कार या सत्कार सोहळ्यात विद्यार्थ्यांसमोर पूजाने स्वतःच्या यशाचा प्रवास, अभ्यास पद्धती आणि स्पर्धा परीक्षांसाठी घेतलेले परिश्रम याबद्दल मार्गदर्शन केले. तिच्या यशामुळे संपूर्ण शाळेला अभिमान वाटत असून, तिचा हा प्रवास इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला. भारत विद्यालयाच्या वतीने पूजा धोपटे हिचे गुणगौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले असून, भविष्यातही अशीच घोडदौड कायम राहो, असे सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# बोपापुर (वाणी) येथे वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन




**बोपापुर (वाणी)। प्रतिनिधी**

नॅशनल डेअरी डेव्हलपमें बोर्ड,व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर. अंतर्गत शुद्ध गौळाऊ वंशावळ निवड प्रकल्प तर्फे बोपापुर (वाणी) वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मध्ये वंध्यत्व निवारण,खच्चीकरण,जंत निर्मूलन, खनिज मिश्रणाचे वाटप, गर्भ तपासणी,करण्यात आली. शिबिराची सुरवात रत्नाकर कोंबे पोलीस पाटील यांच्या हस्ते गायीचे पूजन करून करण्यात आले.सदर शिबीर हे डॉ. नामदेव राऊत, पशुधन विकास अधिकारी (निवृत्त) फिरते पशुवैद्यकीय दवाखाना, देवळी. यांच्या मार्गदर्शनाखाली श्री प्रमोद लोहकरे,श्री आशिष दिघीकर श्री आदित्य हिंगे, श्री विजय डोंगरे यांनी पशुवर उपचार केले. सदर शिबिराला बोपापुर येथील पशुपालकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद होता. सदर शिबिराचे आयोजन विजय डोंगरे यांनी आशिष दिघीकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले

# सत निरंकारी मंडळ दिल्ली ब्रांच मुल तर्फे स्वच्छता अभियान



**मुल । प्रतिनिधी**

स्वच्छ जल स्वच्छ मन अमृत प्रोजेक्ट २०२५ संत निरंकारी मिशन अंतर्गत दरवर्षी २३ फरवरी गुरुपूजा दिवस संपूर्ण विश्वात आयोजित केल्या जातो अंतर्गत विविध उपक्रम राबविला जातात यावर्षी सुद्धा प्रोजेक्ट अमृत अंतर्गत स्वच्छ जल स्वच्छ मन या मिशन अंतर्गत विविध जलस्तोत्रांची स्वच्छता राबविण्यात आली यात संत निरंकारी मिशन मूल तर्फे सोमनाथ देवस्थान धबधबा सफाई सेवा दल निरंकारी आणि साध संगत यांनी सफाई करण्यात आली यात मारोडा ग्रामपंचायत यांचे सुद्धा योगदान लाभले सकाळी ८ वाजता सेवादल प्रार्थना करून सद्गुरु माता सुदिक्षा सविंदर हरदेव यांच्या कृपेने अभियानाला सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमाला मुल ब्रॉच चे मुखी लक्ष्मणजी निकुरे मुल .नानाजी पिपरे केरोडा. प्रशांत भुरसे .सोमेश्वर कंचावर खेडी. देवराव मोहुलै मॅनेजर सावली.देवरावजी ककलवार. सेवादल सचालक महेश रेड्डीवार कवडुजी कोल्हे विलास जी सिडाम.डॉ.नामदेवजी सोनुले विरई.विष्णू उधवानी.सुरेशजी कामडे. शेकडो निरंकारी अनुयायी उपस्थितीत होते १२ वाजता कार्यक्रमाची सांगता झाली असे सतोष निकुरे मुल यांनी कळविले

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जय बजरंग रोहा संघाची शानदार कामगिरी



**रायगड । ज्ञानेश्वर वाणी**

नागाव, अलिबाग येथे दर्यावर्दी मित्रपरिवार आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १६ उत्कृष्ट संघांनी सहभाग घेत स्पर्धेला रंगत आणली.या स्पर्धेत रोहा येथील जय बजरंग रोहा कबड्डी संघाने अप्रतिम खेळ करत उपविजेतेपद पटकावले. संघाने दुसरा क्रमांक मिळवत २२,००० (बावीस हजार) रुपये रोख व चषक जिंकला.

जय बजरंग रोहा संघातील कुमार राज ज्ञानेश्वर मोरे याने उत्कृष्ट चढाईपटू म्हणून खेळ करत १०,००० (दहा हजार) रुपये रोख व चषक पटकावला. त्याच्या या उत्तम प्रदर्शनामुळे रोठ गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण ग्रामस्थांना अभिमान वाटत आहे.जय बजरंग रोहा संघाच्या या यशस्वी कामगिरीची दखल घेत संघाचे अध्यक्ष श्री. अमर सलागरे सर यांनी राज मोरे व संपूर्ण संघाचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.जय बजरंग रोहा संघाच्या या उज्वल यशामुळे रोहा तालुक्यात कबड्डीप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वर्ध्यात भव्य दिव्य आध्यात्मिक सांस्कृतिक महाकुंभ संपन्न



**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील श्री संत भोजाजी महाराज देवस्थान, आजनसरा येथे भव्य दिव्य आध्यात्मिक सांस्कृतिक महाकुंभ आणि २००० वारकऱ्यांचा संमेलन मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी वारकरी संप्रदायातील संत, महंत आणि प्रवचनकारांनी उपस्थित राहून अध्यात्मिक विचारांचा जागर केला.या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष डॉ. विजय परबत आणि अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रमचे अध्यक्ष लक्ष्मणराव गमे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्हिडिओ क्लिपद्वारे मार्गदर्शनपर संदेश देऊन केले. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या संस्कारक्षम कार्याची महती सांगत सामाजिक एकता आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी वारकरी संप्रदायाचे योगदान मोठे आहे, असे मत व्यक्त केले.या आध्यात्मिक महाकुंभात वारकरी संप्रदायातील हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. यावेळी संत-महंतांच्या प्रवचनांनी उपस्थित भाविकांना भक्तीरसात न्हावून काढले.या भव्य आयोजनामुळे वारकरी संप्रदायाचा वारसा आणि संतपरंपरेचा विचार पुढे नेण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. धार्मिक आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यामुळे वारकरी भक्तांमध्ये मोठा उत्साह संचारला.

# दहिगाव योजना सुरळीत सुरू हे संजयमामांच्या प्रयत्नाचे फलित-मा.भरतभाऊ अवताडे

## २०१९ मध्ये दहिगावचे ७३ लाख विज बिल थकीत तर २०२४ मध्ये १ कोटी ९९ लाख विज बिल आगाऊ

**सोलापूर । प्रतिनिधी**

माजी आमदार संजयमामा शिंदे हे स्मार्ट व्हर्जन आहे तर आमदार नारायण पाटील हे आऊटडेटेड व्हर्जन आहे.या दोन्ही नेतृत्वातील फरक सांगताना भरत भाऊ अवताडे म्हणाले की, नारायण पाटील गटाच्या प्रवक्त्याने नाकाने वांगी सोलण्यापूर्वी दहिगाव योजनेची वस्तुस्थिती शेतकऱ्यांसमोर मांडावी.२०१९-२० मध्ये ज्यावेळेस आबांकडून मामाकडे करमाळा तालुक्याचे सूत्रे आली त्यावेळेस दहिगाव उपसा सिंचन योजनेचे थकीत विज बिल ७३ लक्ष होते. या बिलामुळे योजना सुरू करणे कठीण जाणार होते. संबंधित वीज बिल आमदार संजयमामा शिंदे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाला भरायला भाग पाडून दहिगाव योजना सुरू केली. पुढे सलग ३ वर्ष साडेपाच कोटी विज बिल कृष्णा खोरे महामंडळाला भरायला लावले. व सदर बिल भरण्याची हमी विठ्ठल कार्पोरेशन लिमिटेड म्हैसगाव या मामांच्या कारखान्याने घेतली होती .याची नोंद कुकडी डावा कालवा उपविभाग क्रमांक १२ येथे आहे तेथे जाऊन प्रवक्त्याने याचा अभ्यास करावा.४ थ्या वर्षी शेतकऱ्यांकडून वीज बिलासाठी पाणीपट्टी गोळा केली ती जवळपास ३ - साडेतीन कोटी जमा केलेली पाणीपट्टी महावितरण ला भरली.



याच दरम्यान आमदार संजयमामा शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे ५ रुपये ७६ पैसे पर युनिट जे वीज बिल आकारले जात होतं ते १ रुपया १६ पैसे या पद्धतीने आकारले जाऊ लागले. त्याचा इफेक्ट म्हणून महावितरण कडे वीज बील भरलेले होते त्यातील जवळपास २.५० कोटी रुपयांचे वीज बिल शासनाकडे अधिकचे ॲडव्हान्स मध्ये जमा झाले.त्यामुळे ५ व्या वर्षी वीज बिलासाठी पाणीपट्टी गोळा करण्याची आवश्यकता पडली नाही. २०२४ - २५ मध्ये आबांकडे सूत्र आल्यानंतरही किमान २ वर्ष दहिगाव उपसा सिंचन योजनेचे विज बील भरण्याची आवश्यकता नाही.कारण मामांकडून आबांकडे सूत्रे जाताना नोव्हेंबर २०२४ अखेर १ कोटी ९९ लाख ही रक्कम महावितरण कडे शिल्लक आहे हे माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या स्मार्ट व्हर्जनचे ठळक लक्षण आहे असे सांगतानाच अवताडे पुढे म्हणाले की,दहिगाव उपसा सिंचन योजनेचे पाणी बंदिस्त नलिकेतून देण्याची योजना आखून टेल ला पूर्ण क्षमतेने पाणी देणे व बचत होणाऱ्या पाण्यातून इतर ७ गावे समाविष्ट करणे हे स्मार्ट व्हर्जनचे काम संजयमामा शिंदे यांनी केले . विद्यमान आमदार नारायण आबा यांनी बंदिस्त नलिकेतून पाणी देण्याच्या कामाला विरोध दर्शवत या कामामुळे पाणी पर्क्युलेशन होत नाही हे काम बंद करा असा निरोप अधिकारी ,कर्मचारी यांना दिला.एवढेच काय तर पोकलेन ड्रायव्हर यांना धमकावणे, मारहाण करणे हे काम गोरख जाधव या कार्यकत्याकडून केले आहे. पाटील यांना बंद नलीकेला विरोध करायचाच आहे तर तसे पत्र महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाला द्यावे आणि त्यांनी हवी तशी योजना मंजूर करावी. सर्व राज्यात ही योजना सुरू असताना करमाळ्यातच नारायण पाटलांचा याला विरोध हा कशासाठी आहे हे जनतेला सांगण्याची आवश्यकता नाही अशी ही टीका भरत भाऊ अवताडे यांनी केली. आमदार संजयमामा शिंदे यांच्या कार्यकाळात दहिगावचे ६ व कुंभेजचे ४ पंप सुरळीत सुरू होते. एवढेच काय तर वर्षातील ३६५ दिवसांपैकी सरासरी २५० दिवस योजना चालवण्याचा रेकॉर्ड संजयमामांच्या नावे आहे व याची नोंद कुकडी डावा कालवा उपविभाग क्रमांक १२ येथे आहे .सध्या रब्बीचे आवर्तन खूप चांगले सुरू असून जळीत पाईपाचा विषय करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्यास चा आरोप करणारे पाटील गटाचे प्रवक्ते हे दिशाभूल करत आहेत. नेरले व वरकुटे या गावांना पाणी दिल्याचे ते सांगतात पण दहिगाव योजनेच्या लाभ क्षेत्रात असूनही फिसरे,आळसुंदे,सालसे,अर्जुननगर, हिसरे ही गावे पाण्यापासून अद्यापही वंचित का ? या प्रश्नाचे उत्तर प्रवक्ते यांनी द्यावे. या सर्व गावांना यापूर्वी संजय मामांकडून पाणी दिले गेले होते. आपण ही गावे वंचित का ठेवली ? याचा खुलासाही करावा असे अवताडे यांनी सांगितले.

# वैजापूरमध्ये पक्षांतराचा ट्रेंड नेते मंडळींचा सतत बदलता कल

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात सध्या पक्षांतराचा खेळ सुरू असून, राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर आता नगरपरिषद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांची चाहूल लागली आहे. यामुळे अनेक नेते मंडळी पक्ष बदलताना दिसत आहेत.



वैजापूरचे डॉ. दिनेश भाऊ परदेशी यांनी विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी भाजपाला सोडचिठ्ठी देत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटामध्ये प्रवेश केला होता. मात्र, शिंदे गटाचे उमेदवार रमेश पाटील बोरणारे यांनी त्यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. विधानसभा निवडणुकीला अवघे पाच महिने होत असताना डॉ. परदेशी यांनी पुन्हा एकदा भाजपामध्ये घरवापसी केली आहे. फक्त डॉ. परदेशीच नव्हे, तर त्यांच्या सोबत ठाकरे गटाचे जिल्हा परिषद सदस्य अविनाश पाटील गलांडे यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे मंजा हरी गाढे यांनीही भाजपात जाण्याचा निर्णय घेतला आहे.या सततच्या पक्षांतरामुळे वैजापूरमध्ये एकच चर्चा रंगली आहे - नेते मंडळी पक्ष जणू कपड्यांसारखे बदलत आहेत. अशा परिस्थितीत कार्यकर्तेही गोंधळून गेले आहेत की, नेमके कोणत्या पक्षाशी बांधिलकी ठेवायची.यामुळे उद्धव ठाकरे गटाचे वैजापूरमधील अस्तित्व संपुष्टात आले का, असा सवाल उपस्थित होतो. सतत होणाऱ्या पक्षबदलांमुळे लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये हा पक्षांतराचा खेळ आणखी रंगतो का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# महिलेच्या विनयभंगप्रकरणी डॉक्टरला दोन वर्षांची शिक्षा

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील न्हावरा येथे उपचारासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी न्यायालयाने डॉक्टरला दोषी ठरवत दोन वर्षांच्या कारावासाची आणि ३०,००० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.

ही घटना ९ ऑगस्ट २०२० रोजी रात्री १० वाजता घडली. पीडित महिला उपचारासाठी डॉ. रामहरी भुजंगराव लाड यांच्या दवाखान्यात गेली असता, डॉक्टरने तिला ओपीडीमध्ये बोलावून विनयभंग केला. यानंतर पीडित महिलेने शिरूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली.




या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ (अ) आणि ३५४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक एस. एन. मोटे यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. हा खटला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जे. ए. झारी यांच्या न्यायालयात चालला. खटल्यादरम्यान सरकारी वकील माया शिवाजी क्षीरसागर (जाधव) यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपीच्या विरोधात ठोस पुरावे सादर केले. उपलब्ध साक्षी-पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने डॉक्टरला दोषी ठरवत दोन वर्षांची शिक्षा आणि ३०,००० रुपयांचा दंड ठोठावला.या खटल्यात पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी तुकाराम गोरे, महिला पोलीस अंमलदार मनिषा फंड, तसेच पोलीस हवालदार बाळकृष्ण वाडेकर आणि पोलीस अंमलदार प्रकाश वाघमारे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# बदलापुरात मनसे आक्रमक; मराठी पाट्यां साठी दुकानदारांना दोन दिवसांचा अल्टिमेटम

**बदलापूर । प्रतिनिधी**

न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व दुकाने आणि संस्थांच्या पाट्या मराठीत असणे बंधनकारक असतानाही बदलापूर परिसरातील काही दुकानदारांनी अद्याप मराठी पाट्या लावल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित दुकानांची भेट घेऊन त्यांना २७ फेब्रुवारी, मराठी भाषा गौरव दिनापर्यंत मराठीत पाट्या लावण्याचा अल्टिमेटम दिला आहे.मनसे बदलापूर शहराध्यक्ष संगीत चेंदवणकर यांनी सर्व दुकानदारांना विनंती पत्र देऊन मराठी पाट्या लावण्याची सूचना केली आहे. मात्र, वेळेत पाट्या लावल्या नाहीत, तर मनसे स्टाईलने उत्तर देऊ, असा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच, मराठी भाषा आणि न्यायालयाच्या आदेशाचा अपमान सहन केला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.या वेळी स्नेह देशपांडे, गणेश पिल्लई, नंदा पांढरे, रेखा मोरे, वनिता काळे, रसिका बिजितकर, माधुरी गोईल, लक्ष्मण कोचरेकर, श्रवण सकपाळ यांसह मनसे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मनसेच्या या भूमिकेमुळे बदलापूर परिसरातील दुकानदार आणि व्यावसायिकांमध्ये



हलचल निर्माण झाली असून, पुढील दोन दिवसांत दुकानदार काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुळी येथे उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**मुळी । प्रतिनिधी**

गंगाखेड तालुक्यातील मौजे मुळी येथे दहा दिवस सुरू असलेल्या उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिराचा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या शिबिरात एकूण ३४ महिलांनी सहभाग नोंदवला.

शिबिरात केंद्रीय शिक्षिका आदरणीय सुनीताताई मस्के यांनी दहा दिवस मुक्कामी राहून सहभागी महिलांना बुद्ध आणि त्यांचा धम्म, दहा परिमिता, तसेच बुद्धाच्या शिकवणीविषयी सखोल मार्गदर्शन केले. समारोप सोहळ्यात भन्ते पी. धम्मानंद व केंद्रीय शिक्षिका सुनीताताई मस्के यांच्या हस्ते सहभागी महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.धम्मदेसना आणि सन्माननीय उपस्थिती ,समारोप सोहळ्यात पुज्य भन्ते



पी. धम्मानंद यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले आणि धम्मदेसना केली. या कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे विविध मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते, त्यामध्ये ,,,परभणी उत्तर जिल्हाध्यक्ष मा. अशोक कांबळे,,दक्षिण माजी जिल्हाध्यक्ष श्यामराव जोगदंड,,कार्यालयीन सचिव नागशेन हत्तीअंबीरे,,गंगाखेड तालुकाध्यक्ष पंडितराव पारवे,,जिल्हा संघटक अशोक गायकवाड,,संस्कार सचिव नवनाथ साळवे, सरचिटणीस रमेशजी जोंधळे, कोषाध्यक्ष गोरखनाथ कांबळे, पर्यटन सचिव नाना लांडगे, संस्कार उपाध्यक्ष सखाराम पंडित, निवृत्ती गायकवाड, याशिवाय, वंचित बहुजन आघाडीचे, लातूर जिल्हा पक्ष निरीक्षक शुद्धोदन सावंत, परभणी जिल्हा संघटक कृष्णा सावंत, तालुका प्रसिद्धी प्रमुख लहुराज केदारे ही मान्यवर मंडळी देखील उपस्थित होती. या दहा दिवसीय शिबिराचे आयोजन मा. केवळ साळवे, साहेबराव साळवे, मिलिंद साळवे आणि समता सैनिकांनी केले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी त्यांनी मोठे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश जोंधळे यांनी केले. आभार प्रदर्शनाने समारोप सोहळ्याची सांगता झाली. हे शिबिर महिलांसाठी आत्मसाक्षरता आणि धम्म शिक्षणाचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम ठरला असून, अशा उपक्रमांमुळे समाजात बौद्ध धम्मविषयी जागृती वाढेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# आर्य वैश्य कोमटी समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याचा केविलवाना प्रयत्न-डॉ.अशोक जीवतोडे

## राज्य मागास आयोगाला निवेदन सादर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्य मागास आयोगाचे अध्यक्ष व सदस्य चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे विरोध दर्शविण्यात येऊन निवेदन देण्यात आले. आर्य वैश्य कोमटी समाज हा महाराष्ट्रात सधन समाज म्हणून ओळखला जातो. तरी देखील तो समाज ओबीसी प्रवर्गात आणण्यासाठी राजकीय दबावाचा वापर करून, दिशाभूल करून केविलवाणा प्रयत्न करीत आहे. आज आयोगातर्फे सुनावणी ठेवण्यात आली असता राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे विरोध करण्यात आला व आयोगाला निवेदन देण्यात आले, कोमटी समाजात कुणी बेरोजगार, मजूर, शेतमजूर, पाणठेले, भाजीविक्रेते, लहान दुकानदार, बेधर, अल्पभूधारक, आर्थिक दृष्ट्या कमकुवत परिवार दिसून येत नाही. आजपर्यंत १९९२ पासून कोमटी समाजाला आरक्षण मिळावे म्हणून कधी प्रयत्न झाला नाही. मात्र राजकीय वजन वापरून आर्य वैश्य कोमटी समाज ओबीसीत आणून राजकीय क्षेत्रात मूळ ओबीसींच्या हक्कांच्या जागा बळकाविण्याचा हा केविलवाणा प्रयत्न दिसून येतो, असे प्रतिपादन डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले.राज्य मागास आयोगाने राष्ट्रीय ओबीसी महासंघाची बाजु ऐकुन घ्यावी, महासंघ सुनावणीसाठी उपस्थित राहील, तसेच आर्य वैश्य कोमटी समाज मागास नाही याचे पुरावे देण्यात येईल, असे राष्ट्रीय महासचिव सचिन राजूरकर यांनी म्हटले. मा. आयोगाला निवेदन सादर करीत असतांना राष्ट्रीय ओगीसी महासंघाने राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे, राष्ट्रीय महासचिव सनिन राजूरकर, विदर्भ अध्यक्ष दिनेश चोखारे, जिल्हाध्यक्ष नितीन कुकडे, सौ. मनिषा बोबडे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




राज्य मागास आयोगाला निवेदन देवांना डॉ. अशोक जीवतोडे, सचिन राजुरकर, दिनेश चोखारे, नितीन कुकडे व इतर मान्यवर

# माळशिरस तालुका जि.प.सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाळासाहेब शिंदे तर व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब भोसले यांची निवड

**माळशिरस । श्रीकृष्ण देशपांडे**

माळशिरस तालुका जिल्हा परिषद सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, माळशिरस या संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली होती. दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेच्या माळशिरस येथील कार्यालयात चेअरमन व व्हाईस चेअरमन पदांसाठी निवड प्रक्रिया पार पडली. ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात आली.



यामध्ये पंचायत समिती माळशिरसच्या अर्थ विभागातील लेखाधिकारी बाळासाहेब विजय शिंदे यांची चेअरमनपदी तर ग्राम पंचायत अधिकारी बाळासाहेब आण्णा भोसले यांची व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.सदरील निवडीनंतर संस्थेचे संचालक ग्राम पंचायत अधिकारी सचिन बनकर, कनिष्ठ सहाय्यक तथा नवनिर्वाचित संचालक धन्यकुमार काळे यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे ज्येष्ठ संचालक प्रभारी उप अभियंता आर. एस. रणनवरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा अध्यासी अधिकारी बंडगर साहेब यांचा सत्कार केला.यावेळी मावळते चेअरमन रवींद्र पवार यांनी नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. तद्नंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उपस्थित संचालकांचा सन्मान करण्यात आला.संस्थेची संचालक मंडळ बिनविरोध करण्यासाठी विविध कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.निवडणूक प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा जिल्हा परिषदेच्या विविध संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित असलेले प्रमुख मान्यवर –महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे माळशिरस तालुका अध्यक्ष तथा नवनिर्वाचित संचालक धन्यकुमार काळेमार्गदर्शक ग्राम पंचायत अधिकारी दिपक गोरेग्रामसेवक संघटना ऊछ– १३६ चे माळशिरस तालुका अध्यक्ष विजयसिंह माने देशमुखग्राम पंचायत अधिकारी पानसरे भाऊसाहेब, पी. एम. एकतपुरे, ए. वाय. होळ,आडगळे भाऊसाहेबया निवडणूक प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बंडगर साहेब यांनी प्रमुख जबाबदारी पार पाडली, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून संस्थेचे सचिव श्री. राजेंद्र मिसाळ यांनी काम पाहिले. त्यांना श्री. बापू माने (शिपाई) यांनी सहाय्य केले.या निवडीनंतर उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. माळशिरस तालुका जि. प. सेवकांची सहकारी पतसंस्था आपल्या कार्यक्षम नेतृत्वाखाली अधिक प्रगती करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## कांचन कोकडे प्रथम; संविधान गौरव महोत्सवात लाखनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उत्कृष्ठ सहभाग

**भंडारा । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेच्या ७५व्या वर्षपूर्तीनिमित्त लाखनी निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाअंतर्गत निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.




वक्तृत्व स्पर्धेत बी.ए. प्रथम वर्षाच्या कांचन कोकडे हिने प्रथम क्रमांक, कू. तृप्ती येळेकर हिने द्वितीय क्रमांक, तर कु. स्वाती धरम शहारे हिने तृतीय क्रमांक मिळवत चमकदार कामगिरी केली. विजेत्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले.या स्पर्धांचे परीक्षण डॉ. सी.एस. देवघरे, डॉ. गीता टीचकुले, प्रा. तृप्ती बिसेन आणि प्रा. रुपचंद डोंगरावार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. पुण्यशिल टेंभुर्णे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. श्रद्धा बोरकर यांनी मानले.

या महोत्सवाचे उद्दिष्ट संविधानाच्या मूलभूत तत्त्वांची जाणीव करून देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवण करणे होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी संविधानाबद्दलचा अभिमान निर्माण करणारा आणि त्यांच्या ज्ञानात भर घालणारा ठरला.

## श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिरांत भक्तांची अलोट गर्दी

**मोखाडा । जितेंद्र मोरघा**

मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथे महाशिवरात्र निमित्ताने श्री घुटकेश्वर महादेव मंदिरांत पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शन घेतले. येथील मंदिर समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महाशिवरात्री च्या निमित्ताने करण्यात आले होते.यावेळी मंदिर समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मंदिर बांधकामासाठी सहकार्य करणाऱ्या देणगी दारांना सन्मान पत्र शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.




सकाळ पासून च विविध गांवामधुन पायी दिंड्या भजन किर्तनाचा जयघोष करीत श्री घुटकेश्वराच्या दर्शनासाठी येत होत्या. महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, स्वाध्याय परिवार कार्यक्रम,ह.भ.प.रघुनाथ महाराज झोले यांचे किर्तन रात्री भजन असा संपूर्ण दिवस चा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या भाविकांचे आभार मंदिर समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मानले.

# 'महादेवा जातो गा' च्या गजरात ढगा येथे महाशिवरात्रीची भव्य यात्रा!

**७० हजाराहून अधिक भाविकांचे शिवलिंग दर्शन; प्रहार संस्थेच्या स्वयंसेवकांचा सेवा प्रकल्प यशस्वी**





**ढगा भूवन । प्रतिनिधी**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर ढगा येथील प्राचीन शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. लहान महादेव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पवित्र स्थळी दुपारपर्यंत ७० हजारांहून अधिक भक्तगणांनी दर्शनाचा लाभ घेतला.यात्रेकरूंच्या सुविधेसाठी जिल्हा प्रशासन, बोर व्याघ्र प्रकल्प आणि प्रहार समाज जागृती संस्थेच्या स्वयंसेवकांनी विशेष सेवा प्रकल्प राबविला. यात्रेच्या व्यवस्थापनासाठी स्वयंसेवकांनी मोठी भूमिका बजावली. गर्दी नियंत्रण, पिण्याच्या पाण्याची सोय, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मदत, प्रथमोपचार व्यवस्था, जंगल व पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती आणि पोलिस व वन विभागाला सहकार्य अशा विविध सेवा दिल्या.

या सेवा प्रकल्पाचे नेतृत्व प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर, रोव्हर लिडर संतोष तुरक, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. रवींद्र गुजरकर आणि गणेश शेंडे यांनी केले. एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील रोव्हर, रेंजर आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.यामध्ये प्रणव मेश्राम, प्रतीक मडकाम, आदर्श नाईक, मनोज नेहारे, वैष्णवी शिरभाते, साक्षी पारीसे, कोमल शितळे, श्रद्धा मडावी, मनीषा मडकाम, रसीका बानकर, खुशी पचारे, शितल आष्टकार, वैष्णवी कन्नाके, निशा कांबळे, लक्ष्मी कावळे, अंजली झाडे, गायत्री पदीले, प्राप्ती मांढरे, अंजली कामडी, सुजल पराते, पायल चौके, मयूरी पेटकर, कांचन राऊत, पूर्वा कापटे, गौरी खडसे, सलोनी अजमिरे, समीक्षा नेवारे, यश साटोणे, व्हिकी पेंदोरकर, उदय काळे, शुभम पारीसे, कुंदन कावडे, दुर्गेश पोटे, गिरीधर नेहारे, अभिषेक नेहारे, वेदांत कन्नाके, साहील रामगडे, युवराज डफरे, निशांत शितळे, शूरतिका कोल्हे यांसह अनेक स्वयंसेवकांनी आपले योगदान दिले.प्रहार संस्थेच्या या उपक्रमामुळे यात्रेकरूंना सुरक्षित व आनंददायी अनुभव मिळाला. महादेवाच्या जयघोषात पार पडलेली ही यात्रा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

## शिक्षक दांपत्याचा स्तुत्य उपक्रम

## अनाथालयातील मुलांसाठी 'छावा' चित्रपटाचे विशेष आयोजन



**शिरूर । रमेश बनसोडे**

कासारी फाटा (ता. शिरूर) येथील आशीर्वाद ट्रस्ट संचलित गुरुकुल आश्रमातील विद्यार्थ्यांसाठी 'छावा' चित्रपटाचे विशेष आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन उपक्रमशील शिक्षक दांपत्य राहुल चातुर आणि ललिता भुजबळ यांच्या वतीने करण्यात आले.गुरुकुल आश्रमात ऊसतोडणी मजूर, भटके विमुक्त, वंचित, आदिवासी आणि वीटभट्टी कामगारांच्या मुलांचे संगोपन व शिक्षण दिले जाते. आश्रम संचालक शिवाजी शिंदे यांनी स्वखर्चाने हे सामाजिक कार्य हाती घेतले आहे.

सध्या संपूर्ण देशभरात 'छावा' चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू असताना या आश्रमातील विद्यार्थ्यांनाही छत्रपती संभाजी महाराजांचे प्रेरणादायी जीवन कळावे, त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा चित्रपट दाखवण्यात आला.चित्रपट पाहताना मुले पूर्णपणे एकाग्र होती आणि अखेरच्या दृश्यांमध्ये भावनावश होऊन गहिवरून गेली. हा उपक्रम त्यांच्या ज्ञान आणि मनोरंजनासाठी उपयुक्त ठरला.आशीर्वाद ट्रस्टच्या वतीने राहुल चातुर आणि ललिता भुजबळ यांचे आभार मानण्यात आले. तसेच, गटविकास अधिकारी महेश डोके आणि गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी या उपक्रमाबद्दल शिक्षक दांपत्याचे विशेष कौतुक केले.हा भावस्पर्शी उपक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या राष्ट्रप्रेम आणि प्रेरणादायी विचारसरणीला चालना देणारा ठरला. असे सामाजिक उपक्रम भविष्यातही राबविण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ठाण्यात वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यात वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, मोठ्या संख्येने नागरिक आपल्या समस्या घेऊन उपस्थित होते. सोमवारी पार पडलेल्या या जनता दरबारात तब्बल ६५० पेक्षा अधिक लेखी निवेदने नागरिकांनी सादर केली. या दरम्यान, काही निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करण्यात आली, तर उर्वरित अर्जांची सोडवणूक कालबद्ध पद्धतीने करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले.





गणेश नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार घेणार असल्याची घोषणा केल्यानंतर महायुतीतील अंतर्गत घडामोडींना वेग आला होता. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी देखील आपण पालघरमध्ये जनता दरबार घेऊ, असे जाहीर केले होते. मात्र, नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार भरवून शिवसेना शिंदे गटाला जोरदार राजकीय संदेश दिला असल्याचे बोलले जात आहे.

जनता दरबारात उपस्थित अधिकाऱ्यांना नाईक यांनी स्पष्ट निर्देश दिले की, जनतेच्या तक्रारी तत्काळ मार्गी लागाव्यात. काही अर्जांवर जनता दरबारातच अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून लगेच कार्यवाही करण्यात आली. उर्वरित निवेदनांचा पंधरा दिवसांत आढावा घेतला जाईल, असे नाईक यांनी जाहीर केले. याचा अर्थ ते ठाण्यात वारंवार जनता दरबार घेणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

या जनता दरबारात शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध प्राधिकरणांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महायुतीचे विविध नेतेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामध्ये –,भाजपा आमदार संजय केळकर,,माजी खासदार डॉ. संजीव नाईक,,आमदार निरंजन डावखरे,,भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुले,,प्रदेश पदाधिकारी संदीप लेले,,राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे गणेश नाईक यांनी जनता दरबार ही केवळ लोकसंवादाची संकल्पना नसून, तो जनतेला दिलेला शब्द पाळण्यासाठी आहे, असे स्पष्ट केले. महायुतीतील तिन्ही पक्ष मिळून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा पुनरुच्चार करत, यापुढेही ठाण्यात नियमित जनता दरबार घेतला जाईल, असे ते म्हणाले.गणेश नाईक यांनी घेतलेल्या या जनता दरबारामुळे जनतेला थेट आपल्या समस्यांसाठी एका व्यासपीठावर बोलण्याची संधी मिळाली. त्यांची तक्रार ऐकून घेऊन तातडीने कार्यवाही होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमामुळे महायुतीतील अंतर्गत राजकारणालाही वेग आला असून, ठाण्यात आगामी राजकीय हालचालींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .